26 OCT 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

सामाजिक समावेशन व्यवहारात उतरावे

कुलगुरू डॉ. कामत : विद्यापीठात 'पहिली सामाजिक समावेशन गोलमेज' परिषद

कोल्हापूर, ता. २५ : 'सामाजिक समावेशनाचे सिद्धांत आणि धोरण हे वंचितता नष्ट करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. आता ती प्रत्यक्ष व्यवहारात उतरविणे आवश्यक बनले आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी येथे केले.

महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे 'पहिली सामाजिक समावेशन गोलमेज परिषद' झाली. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे उपस्थित होते.

'सामाजिक वंचितता व समावेशन : संकल्पना, सिद्धांत आणि व्यवहार' हा या परिषदेचा मुख्य विषय होता. सामाजिक वंचिततेची ऐतिहासिक कारणे, तिचे बदलते स्वरूप, भारतीय समतावादी विचार परंपरा आणि सामाजिक समावेशनाच्या धोरणात्मक व व्यावहारिक पैलूंवर या परिषदेत विचारमंथन झाले. पहिल्या सत्रात 'सामाजिक वंचितता व समावेशन : संकल्पना, सिद्धांत आणि ऐतिहासिक संदर्भ' या विषयावर चर्चा झाली. प्राचार्य डॉ. हरीश भालेराव यांच्या अध्यक्षतेखालील या सत्रात ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर, पी. एस. कांबळे, शरद गायकवाड यांनी मांडणी केली. दुसऱ्या सत्रात 'फुले विचार आणि भारतीय समतावादी विचार परंपरा' या विषयावर चर्चा झाली. या सत्रात डॉ. दशरथ पारेकर, प्रा. भारती पाटील, डॉ. अरुण शिंदे यांनी विचार मांडले.

तिसऱ्या सत्रांत 'धोरणे, व्यवहार आणि सामाजिक समावेशनाचे भवितव्य' या विषयावर विचारमंथन झाले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजेंद्र कुंभार, संपत देसाई, हमायू मुरसल यांनी विविध मुद्द्यांवर मते मांडली. समारोपप्रसंगी सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. एम. के. भानारकर यांनी सामूहिक निष्कर्ष व शिफारशींची मांडणी केली. डॉ. गिरीश मोरे, कैलास अंबुलगेकर, दीपा श्रावस्ती, विनोद पवार, पवनकुमार गायकवाड, चंद्रकांत कुरणे, प्रतिभा देसाई, शरद बनसोडे, विवेक धुपदाळे, भरत नाईक, विद्यानंद खंडागळे, चेतना सोनकांबळे, निशा पवार, शिवाजी जाधव, तृप्ती करीकट्टी, विश्वजित गुरव सहभागी झाले. अविनाश भाले यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे घेतलेल्या सामाजिक समावेशन गोलमेज परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. शेजारी डॉ. भारत पाटणकर, सुरेश शिपूरकर, दशरथ पारेकर, सिद्धार्थ शिंदे आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 OCT 2026

पुढारी

युवतींनी आत्मविश्वासाने नेतृत्वाची धुरा सांभाळावी

परिसंवादातील संदेश; 'नारी तू नारायणी' संमेलन उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

युवतींनी स्वतःच्या क्षमता ओळखून आत्मविश्वासाने पुढे यावे, निर्णयक्षम बनावे आणि समाज जीवनातील विविध क्षेत्रांत सक्रिय सहभाग घ्यावा, असा संदेश 'नारी तू नारायणी' युवती संमेलनातील परिसंवादातून देण्यात आला. शिक्षण, सामाजिक कार्य, नेतृत्व आणि महिलांसमोरील आव्हानांवर विचारमंथन झाले.



कोल्हापूर : 'नारी तू नारायणी' संमेलनात बोलताना शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. समवेत सौम्या तिरोडकर, अर्पिता मंत्री.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, कोल्हापूर महानगरच्या वतीने संमेलनाचे आयोजन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव व सामाजिक कार्यकर्त्या सौम्या तिरोडकर यांनी परिसंवादात अनुभव मांडले. अर्पिता मंत्री यांनी चर्चा प्रवर्तक म्हणून काम पाहिले. आंतरराष्ट्रीय नेमबाज व अर्जुन पुरस्कार विजेत्या राही सरनोबत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. महापौर रूपाराणी निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.

संमेलनात सामाजिक समरसता, कुटुंबप्रबोधन, पर्यावरणपूरक जीवनशैली, स्वदेशी आणि नागरिक कर्तव्ये या 'पंचपरिवर्तन' संकल्पनेवर भर देण्यात आला. विविध नऊ क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या युवतींचा 'आजच्या नवदुर्गा' म्हणून सन्मान करण्यात आला. अनुजा धरणगावकर यांनी 'महिला विमर्श' विषयावर मार्गदर्शन केले. संमेलनात शहरातील विविध महाविद्यालयांतील युवती सहभागी झाल्या होत्या.

26 OCT 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाविद्यालय चुकले, विद्यापीठाने सावरले

कसबा बीडमधील प्रकरण; व्यवस्थापन परिषद सदस्याच्या प्रयत्नाने विद्यार्थिनींचे वर्ष वाचले

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : महाविद्यालयीनस्तरावर झालेल्या चुकीमुळे शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीच्या कारवाईचा फटका बी.एस्सी. भाग एकमध्ये शिक्षण घेणाऱ्या एका गुणवंत विद्यार्थिनीला बसला. मात्र, या प्रकरणात विद्यार्थिनीची कोणतीही चूक नसल्याचे चौकशीत स्पष्ट झाल्यानंतर विद्यापीठाने तिला विशेष परीक्षेला बसण्याची संधी दिली. या विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान टळले.

कसबा बीड (ता.करवीर) परिसरातील एका महाविद्यालयात हा प्रकार घडला. त्याची माहिती



विद्यार्थिनीच्या पालकांनी व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांना दिली. विद्यार्थिनीची चूक नसताना तिचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, तिला पुढील शिक्षणाची संधी मिळावी, या उद्देशाने परुळेकर यांनी विद्यापीठस्तरावर पाठपुरावा सुरू केला. त्यांनी हा प्रकार कुलगुरू आणि परीक्षा मंडळाच्या संचालकांसमोर मांडत विद्यार्थिनीच्या प्रकरणाची वस्तुस्थिती तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी केली. पुढे विद्यापीठाने सकारात्मक भूमिका घेत मार्चमध्ये झालेल्या कॅरिऑनच्या विशेष परीक्षेवेळी संबंधित विद्यार्थिनीला पेपर देण्याची संधी उपलब्ध करून दिली. तिला परीक्षा देऊन पुढील शैक्षणिक वाटचाल सुरू ठेवण्याचा मार्ग मोकळा झाला.

> महाविद्यालयीन स्तरावरील चुकीचा फटका गुणवंत विद्यार्थ्याला बसल्यास त्याच्या शैक्षणिक भवितव्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, हे या प्रकरणातून समोर आले. त्याचवेळी एखाद्या विद्यार्थ्यावरील आरोपांची वस्तुस्थिती तपासून, त्याची प्रत्यक्ष चूक आहे की नाही, याची खातरजमा करून निर्णय घेणे किती महत्त्वाचे आहे, हे अधोरेखित झाले.
> **-ॲड. स्वागत परुळेकर,** सदस्य, व्यवस्थापन परिषद.

अभ्यासातील मुद्द्यांनी तारले

■ **या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन विद्यापीठाकडून पुढील चौकशी प्रक्रिया राबविली. परीक्षा प्रमाद समितीसमोर आलेल्या कॉपी प्रकरणांत काही विद्यार्थ्यांनी एआय साधनांचा वापर करून उत्तरे लिहिल्याचे चौकशीत स्पष्ट झाले. मात्र, संबंधित विद्यार्थिनीने उत्तरपत्रिकेत लिहिलेली उत्तरे आणि त्यातील मुद्द्यांची मांडणी तपासली असता, त्यात एआयचा वापर झाल्याचे आढळले नाही. उलट, तिने केलेल्या अभ्यासातील मुद्दे आणि स्वतःच्या अभ्यासातून मांडलेली उत्तरे त्यात असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अन्य विद्यार्थ्यांच्या प्रकरणात समोर आलेल्या प्रकाराशी संबंधित विद्यार्थिनीचा संबंध नसल्याचे स्पष्ट झाले.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 OCT 2026

पुढारी

सुसंस्कृत समाजनिर्मितीसाठी साहित्य महत्त्वाचे

डॉ. हुबनाथ पांडेय; विद्यापीठात 'लेखक से रूबरू' कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सुसंस्कृत समाजनिर्मितीमध्ये साहित्याची भूमिका महत्त्वाची आहे. साहित्य माणसाला माणूस बनवते. साहित्यामुळे माणसातील पशुत्व कमी होऊन माणुसकी विकसित होण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्येकाने जीवनात मानवतेची बीजे पेरत जगले पाहिजे. साहित्याकडे केवळ जगण्याचे साधन म्हणून न पाहता संस्कारांचे आगर म्हणून पाहावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, कवी प्रा. डॉ. हुबनाथ पांडेय यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'लेखक से रूबरू' कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी मुंबई विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. पांडेय यांनी मानवी जीवनातील साहित्याचे महत्त्व स्पष्ट केले. ज्येष्ठ गझलकार राकेश शर्मा यांनी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारी गझल सादर केली.



कोल्हापूर : विद्यापीठातील 'लेखक से रूबरू' कार्यक्रमात बोलताना कवी प्रा. डॉ. हुबनाथ पांडेय.

रमण मिश्र यांनी विविध साहित्यप्रकारांची निर्मिती कशामुळे व कशा प्रकारे झाली, याविषयी मार्गदर्शन केले. हिंदी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी पुस्तक देऊन मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी डॉ. गीता दोडमणी यांच्यासह एम.ए. भाग एक व दोनचे विद्यार्थी, संशोधक उपस्थित होते. डॉ. जयसिंग कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नरसिंग एकले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 OCT 2026

पुढारी

ध्येयदृष्टी, प्रत्यक्ष कार्य हीच खरी देशसेवा

डॉ. अवनीश पाटील; राजाराम महाविद्यालयात व्याख्यानमाला

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

निश्चित ध्येयाशिवाय महनीय कामगिरी घडू शकत नाही. ज्या क्षेत्रात कार्यरत असाल, तिथे सूर्यासारखे तळपा, मिणमिणता दिवा होऊन राहू नका. प्रत्यक्ष कार्य करणे हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि राजाराम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्राचार्य डॉ. बाळकृष्ण व्याख्यानमालेत 'डॉ. बाळकृष्ण : कार्य व कर्तृत्व' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. क्रांती पाटील होत्या.

डॉ. अवनीश पाटील म्हणाले, डॉ. बाळकृष्ण हे इतिहासकार, अर्थतज्ज्ञ आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासाचे आद्य प्रणेते होते. त्यांनी भारताच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास करताना दारिद्र्य, ब्रिटिशकालीन वि-



कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना डॉ. अवनीश पाटील.

औद्योगिकीकरण आणि भारत-इंग्लंड व्यापारसंबंधांवर महत्त्वपूर्ण संशोधन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा अभ्यास करून त्यांनी 'शिवाजी द ग्रेट' हा चार खंडांचा ग्रंथ सिद्ध केला.

डॉ. रघुनाथ कडाकणे यांनी राजाराम महाविद्यालयाच्या ऐतिहासिक योगदानाचा गौरव केला. प्राचार्या डॉ. क्रांती पाटील यांनी डॉ. बाळकृष्ण यांच्या आदर्शांचे जतन करण्याचे आवाहन केले. डॉ. ऋषीकेश दळवी यांनी प्रास्ताविक केले. वर्षा पांढरे यांनी सूत्रसंचालन केले.